# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 11.11.2024** **वार – सोमवार**

---

**प्रचाररथ**

केंद्रीय संचार ब्यूरो, पुणे प्रादेशिक कार्यालयातर्फे राज्यातील 14 जिल्ह्यात आजपासून मतदार जागृती अभियान सुरु करण्यात आलं आहे. मतदारांना खात्रीने मतदान करण्याचं आवाहन करत शहर आणि ग्रामीण भागात दहा दिवस हा प्रचार रथ फिरणार आहे.

**जनजागृती अभियान**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या हद्दीत येणाऱ्या पिंपरी, भोसरी आणि चिंचवड मतदार संघात मतदानाचं प्रमाण वाढविण्यासाठी महापालिकेच्या वतीनं आयुक्त शेखर सिंह यांच्या नियंत्रणाखाली मतदार जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. त्यानुषंगाने शहरातील विविध मॉल्समध्ये जनजागृती करण्यात आली.

**चंद्रकांत पाटील**

कोथरूडचे आमदार आणि राज्याचे मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील मुलींना मोफत उच्च शिक्षणाची संधी मिळाली. त्याशिवाय पाच वर्षांत चंद्रकांतदादांनी सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्तींच्या कुटुंबांसाठी काम केलं. त्यामुळे दादांचा नम्रपणा समोरच्याला पराभूत करेल, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे पुणे शहर अध्यक्ष दीपक मानकर यांनी व्यक्त केला. कोथरूड मतदारसंघातील रिक्षा चालक संघटनांचा मेळावा आज पार पडला. त्यावेळी ते बोलत होते.

**मिसाळ**

पानशेत पूरग्रस्त सहकारी गृहनिर्माण सोसायट्यांना 99 वर्षांच्या भाडेतत्त्वावर दिलेल्या जागा पूरग्रस्तांना मालकी हक्काने देण्याचा दुरुस्तीचा अध्यादेश सरकारनं काढला होता. आताच्या नवीन अध्यादेशामुळे शहरातील 103 सोसायट्या, चार हजार कुटुंब आणि 80 हजार पुणेकरांना लाभ होणार असल्याची माहिती पर्वती विधानसभा मतदारसंघातील भाजप महायुतीच्या उमेदवार माधुरी मिसाळ यांनी दिली. सहकारनगर परिसरात आज झालेल्या प्रचार फेरीमध्ये त्या बोलत होत्या.

**रासने**

'कामाचे नियोजन करा आणि नियोजनाप्रमाणे काम' हा कानमंत्र देत स्वर्गीय गिरीश बापट यांनी ज्या कार्यालयातून माझ्यासारख्या असंख्य भाजप कार्यकर्त्यांना घडविले, त्याच कार्यालयातून मुख्य निवडणुक कचेरी सुरू करताना विशेष आनंद होतो, अशा भावना भाजप महायुतीचे उमेदवार हेमंत रासने यांनी व्यक्त केल्या. रासने यांच्या निवडणूक कचेरीचे उद्घाटन 95 वर्षांच्या माजी नगरसेविका मीराताई पावगी यांच्या हस्ते आणि महायुतीच्या महिला लोकप्रतिनिधी आणि पदाधिकाऱ्यांच्या प्रमुख उपस्थितीत केल्यावर रासने बोलत होते.

**जयंत पाटील**

गेल्या पंधरा वर्षात पर्वती विधानसभा मतदारसंघाचा विकास झालेला नाही. अनेक कामं प्रलंबित आहेत. ती मार्गी लावण्यासाठी अश्विनी कदम यांना बहुमताने विजयी करा, असं आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केले. अश्विनी कदम यांच्या प्रचारासाठी हिंगणे चौक इथं आयोजित जाहीर सभेत पाटील आज बोलत होते.

**यादव**

'भारत जोडो' हा देशातील सार्वजनिक चळवळीचा एक मंच आहे. म्हणून आम्ही इंडिया आघाडीला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला," असं भारत जोडो अभियान चळवळीचे केंद्रीय प्रमुख योगेंद्र यादव यांनी पुण्यात सांगितलं. पुण्यातील काँग्रेस भवनमध्ये काल ते पत्रकारांशी बोलत होते.

**आरक्षण**

आरक्षणाच्या प्रश्नावरुन मराठा समाजानं संभ्रमित न होता वास्तव समजून सामोरे जाणं आवश्यक आहे, अशी माहिती अखिल भारतीय मराठा महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र कोंढरे यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत दिली. समाजाने माहितीची खातरजमा करून घेऊन नेमकी वस्तुस्थिती समजून घेतली पाहिजे, असंही ते म्हणाले.

**पोलीसमेगासिटी**

गेल्या १२ वर्षांपासून रखडलेला लोहगाव येथील महाराष्ट्र पोलीस मेगा सिटी कॉर्पोरेशनचा गृहनिर्माण प्रकल्प आता लवकरच कार्यान्वित होणार आहे. नेदरलँडस्थित निमशासकीय संस्थेच्या माध्यमातून ६०० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीची टर्मशीट आज 'एमपीएमसी'कडे हस्तांतरित करण्यात आली. यामुळे लवकरच ५ हजार ५०० पोलीस बांधवांच्या घरांचं स्वप्न साकार होण्यास मदत मिळेल, अशी माहिती रुरल एन्हान्सर्स संस्थेचे प्रमुख आणि विदेशी गुंतवणुकीचे समन्वयक अंबर आयदे यांनी दिली.

**लंपी**

पुणे जिल्ह्यात ऊस गाळप हंगाम येत्या पाच ते सहा दिवसांत सुरू होणार आहे. त्या कारखान्यांकडे ऊस वाहतुकीसाठी येणाऱ्या बैलजोडीस लंपी प्रतिबंधात्मक लसीकरण बंधनकारक केले आहे. लंपीबाधित जनावरांना पुणे जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागाच्या वतीने लंपीचा डोस दिला जाणार आहे. ऊस गळीत हंगामासाठी परजिल्ह्यातून बैलजोड्यांसह अनेक जनावरे जिल्ह्यात दाखल होत आहेत. त्यातील बाधित जनावरांवर पशुसंवर्धन विभागाकडून उपचार केले जाणार आहेत.

**प्रकाशन**

"विहित कर्म न सोडता वैराग्यवृत्ती अंत:करणात असली पाहिजे ही समर्थ रामदासस्वामी यांची शिकवण आहे. त्यांनी शिकविलेली 26 सूत्र 'समर्थ नेतृत्व' या पुस्तकात कथा रूपाने मांडली आहेत. समर्थांची मार्गदर्शक तत्त्वे सामान्यांच्या मनात उतरविण्याचे कार्य या पुस्तकाद्वारे घडेल," असा विश्वास दासबोध सखोल अभ्यास उपक्रमाचे संचालक डॉक्टर विजय लाड यांनी व्यक्त केला. सह्याद्री शिखर श्रीरामदास स्वामी पादुका संस्थान ट्रस्ट, महाबळेश्वर मठातर्फे माधव श्रीकांत किल्लेदार लिखित 'समर्थ नेतृत्व' या पुस्तकाचं प्रकाशन डॉ. लाड यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते.

**हवामान -**

पुणे परिसरात सकाळी आणि रात्रीच्या वेळी थंडी वाढत असून, उद्याही शहरात हवामान कोरड राहून किमान तापमान 16 अंश सेल्सिअस राहण्याची शक्यता आहे. तसच सकाळच्या वेळी धुकं पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.